Bid Number/बोली क्रमांक (बिड संख्या): GEM/2023/B/3035974
Dated/दिनांक : 25-01-2023

# Bid Document/ बिड दस्तावेज़

| Bid Details/बिड विवरण | |
|---|---|
| Bid End Date/Time/बिड बंद होने की तारीख/समय | 06-02-2023 17:00:00 |
| Bid Opening Date/Time/बिड खुलने की तारीख/समय | 06-02-2023 17:30:00 |
| Bid Offer Validity (From End Date)/बिड पेशकश वैधता (बंद होने की तारीख से) | 30 (Days) |
| Ministry/State Name/मंत्रालय/राज्य का नाम | Maharashtra |
| Department Name/विभाग का नाम | Higher And Technical Education Department Maharashtra |
| Organisation Name/संगठन का नाम | Directorate Of Technical Education |
| Office Name/कार्यालय का नाम | Head Office |
| Item Category/मद केटेगरी | Security Manpower Service (Version 2.0) - Office/Commercial/Institutions/ Residential; Unarmed Security Guard |
| Contract Period | 11 Month(s) |
| Minimum Average Annual Turnover of the bidder (For 3 Years)/बिडर का न्यूनतम औसत वार्षिक टर्नओवर (3 वर्षों का) | 4 Lakh (s) |
| Years of Past Experience Required for same/similar service/उन्हीं/समान सेवाओं के लिए अपेक्षित विगत अनुभव के वर्ष | 2 Year (s) |
| Past Experience of Similar Services required | Yes |
| MSE Exemption for Years Of Experience/अनुभव के वर्षों से एमएसई छूट/ and Turnover | Yes |
| Startup Exemption for Years of Experience/अनुभव के वर्षों से स्टार्टअप छूट/ and Turnover | No |
| Document required from seller/विक्रेता से मांगे गए दस्तावेज़ | Experience Criteria,Bidder Turnover<br>*In case any bidder is seeking exemption from Experience / Turnover Criteria, the supporting documents to prove his eligibility for exemption must be uploaded for evaluation by the buyer |
| Bid to RA enabled/बिड से रिवर्स नीलामी सक्रिय किया | No |

| Bid Details/बिड विवरण | |
|---|---|
| Type of Bid/बिड का प्रकार | Two Packet Bid |
| Time allowed for Technical Clarifications during technical evaluation/तकनीकी मूल्यांकन के दौरान तकनीकी स्पष्टीकरण हेतु अनुमत समय | 7 Days |
| Evaluation Method/मूल्यांकन पद्धति | Total value wise evaluation |

**EMD Detail/ईएमडी विवरण**

| | |
|---|---|
| Advisory Bank/एडवाईजरी बैंक | State Bank of India |
| EMD Amount/ईएमडी राशि | 32380 |

**ePBG Detail/ईपीबीजी विवरण**

| | |
|---|---|
| Advisory Bank | State Bank of India |
| ePBG Percentage(%)/ईपीबीजी प्रतिशत (%) | 2.00 |
| Duration of ePBG required (Months)/ईपीबीजी की अपेक्षित अवधि (महीने). | 3 |

(a). EMD EXEMPTION: The bidder seeking EMD exemption, must submit the valid supporting document for the relevant category as per GeM GTC with the bid. Under MSE category, only manufacturers for goods and Service Providers for Services are eligible for exemption from EMD. Traders are excluded from the purview of this Policy./जेम की शर्तों के अनुसार ईएमडी छूट के इच्छुक बिडर को संबंधित केटेगरी के लिए बिड के साथ वैध समर्थित दस्तावेज़ प्रस्तुत करने है। एमएसई केटेगरी के अंतर्गत केवल वस्तुओं के लिए विनिर्माता तथा सेवाओं के लिए सेवा प्रदाता ईएमडी से छूट के पात्र हैं। व्यापारियों को इस नीति के दायरे से बाहर रखा गया है।

(b). EMD & Performance security should be in favour of Beneficiary, wherever it is applicable./ईएमडी और संपादन जमानत राशि, जहां यह लागू होती है, लाभार्थी के पक्ष में होनी चाहिए।

**Beneficiary/लाभार्थी :**
Lecturer in Mech Engg
Government Polytechnic, Khamgaon-444303, Dist-Buldhana. (Maharashtra)
(Gaurav Sharadrao Bhoyar)

**Splitting/विभाजन**

Bid splitting not applied.

**MII Compliance**

| | |
|---|---|
| MII Compliance | Yes |

**MSE Purchase Preference/एमएसई खरीद वरीयता**

| | |
|---|---|
| MSE Purchase Preference/एमएसई खरीद वरीयता | No |

1. If the bidder is a Micro or Small Enterprise as per latest definitions under MSME rules, the bidder shall be exempted from the requirement of "Bidder Turnover" criteria and "Experience Criteria" subject to meeting of quality and technical specifications. If the bidder is OEM of the offered products, it would be exempted from the "OEM Average Turnover" criteria also subject to meeting of quality and technical specifications. In case any bidder is seeking exemption from Turnover / Experience Criteria, the supporting documents to prove his eligibility for exemption must be uploaded for evaluation by the buyer.
2. The minimum average annual financial turnover of the bidder during the last three years, ending on 31st March of the previous financial year, should be as indicated above in the bid document. Documentary evidence in the form of certified Audited Balance Sheets of relevant periods or a certificate from the Chartered Accountant / Cost Accountant indicating the turnover details for the relevant period shall be uploaded with the bid. In case the date of constitution / incorporation of the bidder is less than 3-year-old, the average turnover in respect of the completed financial years after the date of constitution shall be taken into account for this criteria.
3. Years of Past Experience required: The bidder must have experience for number of years as indicated above in bid data sheet (ending month of March prior to the bid opening) of providing similar type of services to any Central / State Govt Organization / PSU / Public Listed Company. Copies of relevant contracts / orders to be uploaded along with bid in support of having provided services during each of the Financial year.
4. Past Experience of Similar Services: The Bidder must have successfully executed / completed at least one single order of 80 % of the Estimated Bid Value or 2 orders each of 50 % of the Estimated Bid Value or 3 orders each of 40 % of the Estimated Bid Value for similar service(s) in last three years to any Central / State Govt Organization / PSU / Public Listed Company. Copies of contracts / work orders and documentary evidence of successful execution / completion in support of Past Experience of Similar Services along with names, address and contact details of clients shall be uploaded with the bid for verification by the Buyer.

**Additional Qualification/Data Required**

**Pre Bid Detail(s)**

| Pre-Bid Date and Time | Pre-Bid Venue |
|---|---|
| 01-02-2023 11:00:00 | Online Mode.<br>Government Polytechnic, Khamgaon-444303<br>Dist-Buldhana |

## Security Manpower Service (Version 2.0) - Office/Commercial/Institutions/ Residential; Unarmed Security Guard ( 9 )

**Technical Specifications/तकनीकी विशिष्टियाँ**

| Specification | Values |
|---|---|
| **Core** | |
| Type of Establishment / Area | Office/Commercial/Institutions/ Residential |
| Category of Profile | Unarmed Security Guard |
| Category of Skills | Unskilled |
| Gender | Male |
| Duty Hours in a day | 8 |
| Qualification | Secondary School |
| Ex Servicemen | Optional |
| Age Limit | Up to 55 years |
| Years of Experience | 0 - 3 years |

| Specification | Values |
|---|---|
| Additional Requirements for the Security Personnel | Driver's License |
| **Addon(s)** | |

**Additional Specification Documents/अतिरिक्त विशिष्ट दस्तावेज़**

**Consignees/Reporting Officer/परेषिती/रिपोर्टिंग अधिकारी**

| S.No./क्र. सं. | Consignee Reporting/Officer/ परेषिती/रिपोर्टिंग अधिकारी | Address/पता | Number of resources to be hired | Additional Requirement |
|---|---|---|---|---|
| 1 | Gaurav Sharadrao Bhoyar | 444312,Government Polytechnic, Jalamb Road, Vitthal Nagar, Khamgaon, Dist-Buldhana, Maharashtra | 9 | • Number of working days in a month : 30<br>• Basic Pay (Minimum daily wage) : 385<br>• Bonus (INR per day) : 0<br>• EDLI (INR per day) : 0<br>• EPF Admin charge (INR per day) : 3.74<br>• ESI (INR per day) : 12.5<br>• Optional Allowance 1 (in Rupees) : 0<br>• Optional Allowance 2 (in Rupees) : 0<br>• Optional Allowance 3 (in Rupees) : 0<br>• Provident Fund (INR per day) : 46.13<br>• Tenure/ Duration of Employment : 11 |

## Buyer Added Bid Specific Terms and Conditions/क्रेता द्वारा जोड़ी गई बिड की विशेष शर्तें

1. **Generic**

   OPTION CLAUSE: The Purchaser reserves the right to increase or decrease the quantity to be ordered up to 25 percent of bid quantity at the time of placement of contract. The purchaser also reserves the right to increase the ordered quantity by up to 25% of the contracted quantity during the currency of the contract at the contracted rates. Bidders are bound to accept the orders accordingly.

2. **Certificates**

   Bidder's offer is liable to be rejected if they don't upload any of the certificates / documents sought in the Bid document, ATC and Corrigendum if any.

3. **Payment**

   **PAYMENT OF SALARIES AND WAGES:** Service Provider is required to pay Salaries / wages of contracted staff deployed at buyer location first i.e. on their own and then claim payment from Buyer alongwith all statutory documents like, PF, ESIC etc. as well as the bank statement of payment done to staff.

4. **Generic**

   **Bidder financial standing:** The bidder should not be under liquidation, court receivership or similar proceedings, should not be bankrupt. Bidder to upload undertaking to this effect with bid.

5. **Service & Support**

   AVAILABILITY OF OFFICE OF SERVICE PROVIDER: An office of the Service Provider must be located in the state of Consignee. DOCUMENTARY EVIDENCE TO BE SUBMITTED.

6. **Service & Support**

   Escalation Matrix For Service Support : Bidder/OEM must provide Escalation Matrix of Telephone Numbers for Service Support.

7. **Forms of EMD and PBG**

   Bidders can also submit the EMD with Account Payee Demand Draft in favour of PRINCIPAL, GOVERNMENT POLYTECHNIC, KHAMGAON A/C NO 11244270456 IFSC CODE: SBIN0000407 payable at SBI MAIN BRANCH KHAMGAON.
   Bidder has to upload scanned copy / proof of the DD along with bid and has to ensure delivery of hardcopy to the Buyer within 5 days of Bid End date / Bid Opening date.

8. **Buyer Added Bid Specific ATC**

   Buyer uploaded ATC document Click here to view the file.

## Disclaimer/अस्वीकरण

The additional terms and conditions have been incorporated by the Buyer after approval of the Competent Authority in Buyer Organization, whereby Buyer organization is solely responsible for the impact of these clauses on the bidding process, its outcome, and consequences thereof including any eccentricity / restriction arising in the bidding process due to these ATCs and due to modification of technical specifications and / or terms and conditions governing the bid. Any clause(s) incorporated by the Buyer regarding following shall be treated as null and void and would not be considered as part of bid:-

1. Definition of Class I and Class II suppliers in the bid not in line with the extant Order / Office Memorandum issued by DPIIT in this regard.
2. Seeking EMD submission from bidder(s), including via Additional Terms & Conditions, in contravention to exemption provided to such sellers under GeM GTC.
3. Publishing Custom / BOQ bids for items for which regular GeM categories are available without any Category item bunched with it.
4. Creating BoQ bid for single item.
5. Mentioning specific Brand or Make or Model or Manufacturer or Dealer name.
6. Mandating submission of documents in physical form as a pre-requisite to qualify bidders.
7. Floating / creation of work contracts as Custom Bids in Services.
8. Seeking sample with bid or approval of samples during bid evaluation process.

9. Mandating foreign / international certifications even in case of existence of Indian Standards without specifying equivalent Indian Certification / standards.
10. Seeking experience from specific organization / department / institute only or from foreign / export experience.
11. Creating bid for items from irrelevant categories.
12. Incorporating any clause against the MSME policy and Preference to Make in India Policy.
13. Reference of conditions published on any external site or reference to external documents/clauses.
14. Asking for any Tender fee / Bid Participation fee / Auction fee in case of Bids / Forward Auction, as the case may be.

Further, if any seller has any objection/grievance against these additional clauses or otherwise on any aspect of this bid, they can raise their representation against the same by using the Representation window provided in the bid details field in Seller dashboard after logging in as a seller within 4 days of bid publication on GeM. Buyer is duty bound to reply to all such representations and would not be allowed to open bids if he fails to reply to such representations.

This Bid is governed by the General Terms and Conditions/सामान्य नियम और शर्तें, conditons stipulated in Bid and Service Level Agreement specific to this Service as provided in the Marketplace. However in case if any condition specified in General Terms and Conditions/सामान्य नियम और शर्तें is contradicted by the conditions stipulated in Service Level Agreement, then it will over ride the conditions in the General Terms and Conditions.

In terms of GeM GTC clause 26 regarding Restrictions on procurement from a bidder of a country which shares a land border with India, any bidder from a country which shares a land border with India will be eligible to bid in this tender only if the bidder is registered with the Competent Authority. While participating in bid, Bidder has to undertake compliance of this and any false declaration and non-compliance of this would be a ground for immediate termination of the contract and further legal action in accordance with the laws./जेम की सामान्य शर्तों के खंड 26 के संदर्भ में भारत के साथ भूमि सीमा साझा करने वाले देश के बिडर से खरीद पर प्रतिबंध के संबंध में भारत के साथ भूमि सीमा साझा करने वाले देश का कोई भी बिडर इस निविदा में बिड देने के लिए तभी पात्र होगा जब वह बिड देने वाला सक्षम प्राधिकारी के पास पंजीकृत हो।बिड में भाग लेते समय बिडर को इसका अनुपालन करना होगा और कोई भी गलत घोषणा किए जाने व इसका अनुपालन न करने पर अनुबंध को तत्काल समाप्त करने और कानून के अनुसार आगे की कानूनी कार्रवाई का आधार होगा।

**---Thank You/धन्यवाद---**

शासकीय तंत्रनिकेतन,खामगांव

जलंब रोड, खामगांव-444303, जि.बुलडाणा

फोन क्र.(07263) -252278, 256644 (O), 254609 (R)

E-mail. office.gpkhamgaon@dtemaharashtra.gov.in


निविदा मूल्य
रु. १०००/-

# शासकीय तंत्रनिकेतन खामगाव संस्थेच्या परिसराकरिता करार पद्धतीने सुरक्षा रक्षकाच्या सेवा मिळणेबाबतची online निविदा प्रक्रिया

शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव हि महाराष्ट्र शासनाची तांत्रिक शिक्षण प्रदान करणारी बुलडाणा जिल्ह्यातील अग्रणी संस्था आहे. या संस्थेतील मुख्य ईमारत, विस्तारित ईमारत, कर्मशाळा, उपहारगृह, भांडारगृह, मुलांचे व मुलींचे वसतिगृह, शासकीय निवासस्थाने, मैदाने इत्यादी बाबींच्या सुरक्षेचा दृष्टिकोन समोर ठेऊन रोजंदारी तत्वावर करार पद्धतीने सुरक्षा रक्षकाच्या सेवा उपलब्ध करून मिळण्याकरीता संस्थेमार्फत शासनाच्या GeM पोर्टलच्या माध्यमातून निविदा प्रक्रिया (दोन लिफाफे) पद्धत राबविण्यात येत आहे. यामध्ये संस्थेच्या परिसरातील नेमून दिलेल्या तीन विविध ठिकाणांच्या (points) माध्यमातून सुरक्षा विषयक कामकाज पार पाडणे अपेक्षित आहे. याकरिता तीन पाळी (शिफ्ट ) करिता एकूण 09 सुरक्षारक्षकांची आवश्यकता आहे. या अनुषंगाने नोंदणीकृत संस्था / यंत्रणेकडून या संस्थेच्या वरिष्ठ कार्यालयाच्या मान्यतेच्या अधीन राहून निविदा मागविण्यात येत आहे. याकरिता कराराच्या आवश्यक अटी व शर्ती खाली नमूद करण्यात आल्या आहेत.

## कराराच्या अटी व शर्ती

1) कराराचा कालावधी : कार्य आदेश निर्गमित झाल्यानंतर करार पत्राची कार्यवाही झाल्याच्या दिनांकापासून 11 महिने .
2) कालावधीच्या एकूण 11 महिन्यांपैकी एक महिन्याच्या कालावधी करिता प्रायोगिक तत्वावर काम करणे अपेक्षित आहे. सदर कामकाज समाधान कारक आढळून आल्यास उर्वरित कालावधी करिता कामकाज सुरु ठेवण्यात येईल.
3) कामाची वेळ : प्रत्येकी आठ तासांची एक पाळी ( शिफ्ट ) याप्रमाणे एकूण तीन पाळया : कामाचे एकूण तास 24
4) कामाची व्याप्ती व स्वरूप : सुरक्षा रक्षकांची दैनंदिन कामे व जबाबदाऱ्या पूर्ण पाडणे.
   4.1) नेमून दिलेल्या ठिकाणी सुरक्षा विषयक कामकाज करणे
   4.2) अभ्यागतांचे संस्थेत येणे व संस्थेबाहेर जाणे (आवगमन) यांच्या अचूक नोंदी ठेवणे.
   4.3) संस्थेत येणाऱ्या अनधिकृत व्यक्तींना प्रवेश नाकारणे.

4.4) सायंकाळी कार्यालयीन वेळेनंतर संस्थेचे कार्यालय तसेच संस्थेतील विविध विभाग व्यवस्थित बंद केली आहेत किंवा नाही याची खातरजमा करणे. एखाद्या ठिकाणचे कुलूप व्यवस्थितरित्या बंद केलेले नसल्यास त्याची संस्थेच्या नियंत्रण अधिकाऱ्यास माहिती देणे व तदनंतर संबंधितांच्या स्वाक्षरीची मोहोर ( सील ) लावून कुलूप करून घेणे.

4.5) संस्थेतील पाण्याच्या टाकीचे पाण्याचे पंप नियोजित वेळेनुसार सुरु करणे व बंद करणे.

4.6) संस्थेत लावण्यात आलेल्या वृक्षांची जोपासना करणे

4.7) शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव या संस्थेच्या आवारातील वृक्षांची बाहेरील व्यक्ती वृक्षतोड करीत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याच्या या कृतीस प्रतिबंध करावा. संबंधित व्यक्तीने याबाबतच्या नियमांचे उल्लंघन केल्यास त्याचेवर आवश्यक कार्यवाही करणे.

4.8) संस्थेत चोरीचा प्रकार आढळून आल्यास कर्तव्यावर असल्येल्या सुरक्षा रक्षकाने हि बाब विनाविलंब संस्थेचे नियंत्रण अधिकारी / वरिष्ठांच्या निदर्शनास आणून द्यावी व त्यांचेमार्फत नियमानुसार संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी.

4.9) शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव या संस्थेच्या आवारात गुरे, गाई, म्हशी व इतर जनावरे येण्यास अथवा बांधण्यास तात्काळ प्रतिबंध करावा.

4.10) शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव या संस्थेच्या परिसरातील अतिक्रमण रोखण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करावी.

4.11) शासकीय सुटीच्या दिवशी किंवा कार्यालयीन वेळेनंतर संस्थेत येणारे संदेश, टपाल, दूरध्वनीवरील संदेश आल्यास कर्तव्यावर असल्येल्या सुरक्षा रक्षकाने त्याची माहिती तात्काळ संस्थेच्या नियंत्रण अधिकाऱ्यास द्यावी. महत्वाचे टपाल / पार्सल सोडवून त्याची रितसर नोंद ठेवावी व संबंधितास ते सुरक्षित रित्या पोहचते करावे व त्याबाबतची माहिती नियंत्रण अधिकाऱ्यास द्यावी.

4.12) रात्रपाळीत कार्यरत सुरक्षा रक्षकाने नेमून दिलेल्या परिसरात गस्त घालणे अनिवार्य असेल.

4.13) रात्रपाळीत कार्यरत सुरक्षा रक्षकाने रात्री १० ते सकाळी ६ या कालावधीत प्रत्येक तासाला टोल देणे.

4.14) संस्थेतील अधिकारी / कर्मचारी यांनी वेळोवेळी सांगितलेली सुरक्षाविषयक कामे विनातक्रार पार पाडणे.

4.15) कोव्हीड - १९ या महामारीचा प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीने सांगितलेली कामे करणे. जर कोणी अभ्यागत अथवा विद्यार्थी कोव्हीड विषयक नियमांचे पालन करीत नसल्याचे आढळून आल्यास त्यास खबरदार करणे.

4.16) शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव या संस्थेच्या आवारातील तसेच इमारतीतील दिवे लावणे, बंद करणे, नियोजित वेळी मुख्य प्रवेशद्वार उघडणे व बंद करणे, शासकीय कामानिमित्य कार्यालयीन वेळेनंतर बंद होणारे विभाग / कार्यालय / इमारती इत्यादींच्या चावीची आवक जावक नोंदवही मध्ये रितसर नोंद घेणे. संबंधित अधिकाऱ्यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन करणे व वेळप्रसंगी अधिकाऱ्यास संरक्षण देणे.

4.17) संस्थेतील अधिकाऱ्यांनी सांगितल्यास गरजेनुसार कार्यालय व इतर विभाग उघडण्यास सहकार्य करणे.

4.18) संस्थेतील अधिकारी यांनी निर्देशित केल्यास ध्वजारोहणाचे वेळी संचालन करणे.

4.19) विद्यार्थी / अभ्यागत यांना त्यांची वाहने वाहन तळावर लावण्यास सांगणे.

4.20) संस्थेच्या परिसरात गर्दी आढळून आल्यास गर्दीवर नियंत्रण करणे.

4.21) संस्थेतील शासकीय वस्तूंचे नुकसान होणार नाही याची खबरदारी घेणे.

**5) करार पद्धतीने सुरक्षा रक्षकांचे सेवा पुरवठादार यांनी पालन करावयाच्या कार्यविषयक ( Operational ) अटी व शर्ती**

5.1) सेवा पुरवठादार यांचे द्वारे कार्यरत सुरक्षा रक्षकांचा योग्य गणवेश, काठी - १, शिट्टी - १, टॉर्च - १, बूट, कॅप तसेच पावसाळ्यात वापरण्यास छत्री अथवा रेनकोट व हिवाळी गणवेश इत्यादी आवश्यक साहित्य पुरवणे सेवा पुरवठादारास बंधनकारक राहील.

5.2) सुरक्षा रक्षकांच्या सेवा विषयक बाबींची ( जसे विमा, ई पी एफ , बोनस इत्यादी ) पूर्तता करण्याची संपूर्ण जबाबदारी सेवा पुरवठादार यांची असेल.

5.3) सुरक्षा रक्षकांच्या कामाच्या वेळा / पाळया या बाबी, शासकीय तंत्रनिकेतन खामगाव येथील नियंत्रण अधिकारी यांचे समन्वयाने ठरविण्याची जबाबदारी सेवा पुरवठादाराची राहील.

5.4) शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव या कार्यालयास पुरविण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांची नाव, त्यांच्या रहिवासाचा पूर्ण पत्ता, अनुभव प्रमाणपत्र, विहित प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले चारित्र्य प्रमाणपत्र, ओळखपत्र इत्यादी आवश्यक माहिती व कागदपत्रे सेवा पुरवठादार यांनी नियंत्रण अधिकारी, शासकीय तंत्रनिकेतन खामगांव यांना लेखी स्वरूपात सादर करावी.

5.5) संस्थेत कार्यरत सुरक्षा रक्षकांच्या निवासाची सोय, शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव या संस्थेमार्फत केली जाणार नाही, याची सुस्पष्ट माहिती सुरक्षा रक्षकांना द्यावी.

5.6) सुरक्षा रक्षकांची 'पाळी (Shift) निहाय कार्यभार हस्तांतरण नोंदवही' अद्यावत ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी सेवा पुरवठादार यांची राहील.

5.7) कर्तव्यावर उपस्थित कोणत्याही सुरक्षा रक्षकास त्यांच्या पुढील पाळीतील सुरक्षा रक्षक कामावर येईपर्यंत कार्यमुक्त होता येणार नाही, तसेच सेवाकाळात काही आवश्यक काम असल्यास सुरक्षा रक्षकास पर्यायी व्यवस्था केल्याशिवाय आपली जागा सोडता येणार नाही.

5.8) सुरक्षा रक्षकांच्या गैरहजेरीत पर्यायी व्यवस्था करण्याची संपूर्ण जबाबदारी सेवा पुरवठादार यांची राहील.

5.9) सुरक्षा रक्षकांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी, नियुक्त करण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांमधून एका सुरक्षा रक्षकाची, पर्यवेक्षक म्हणून नेमणूक, सेवा पुरवठादार यांचेद्वारे करण्यात यावी. इतर सुरक्षा रक्षकांना जे मानधन देय राहील, तेच मानधन सादर पर्यवेक्षक यांना देय राहील. कोणताही अतिरिक्त भत्ता किंवा मानधन देय असणार नाही.

5.10) सुरक्षा रक्षकांच्या कर्तव्यावर, शासकीय तंत्रनिकेतन खामगाव येथील नियंत्रण अधिकारी ( मुख्य नियोक्ता ) यांचे नियंत्रण असेल. त्याचबरोबर सेवा पुरवठादार यांनाही नियंत्रण ठेवणे बंधनकारक राहील. सुरक्षा रक्षकाने कर्तव्य कालावधीमध्ये कोणतेही गैरकृत्य अथवा कामचुकारपणा केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सेवा पुरवठादार यांची राहील.

5.11) सुरक्षा रक्षकाला कर्तव्य वेळेत धूम्रपान किंवा मादक पदार्थांचे सेवन करता येणार नाही. तसेच संस्थेच्या आवारात कोणताही व्यवसाय करता येणार नाही.

5.12) सुरक्षा रक्षकाला कर्तव्य कालावधीत झोपता येणार नाही अथवा विनाकारण कर्तव्याच्या ठिकाणापासून इतरत्र जात येणार नाही. जर कर्तव्य कालावधीमध्ये काही गैरकृत्य अथवा चोरी झाल्यास त्याबाबत शासकीय तंत्रनिकेतन खामगाव यांचे नियंत्रण अधिकारी व सेवापुरवठादार यांचेतर्फे एकत्रितरित्या पाहणी / चौकशी करून, झालेल्या चोरीला, सुरक्षा रक्षक जबाबदार असल्याचे आढळल्यास, त्यांचेवर कार्यवाही करावी लागेल तसेच सेवा पुरवठादार यांचेकडून चोरीच्या मालाची रक्कम वसूल करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

5.13) सुरक्षा रक्षकांना नेमून दिलेल्या परिसरात एकाच ठिकाणी राहणे, बसणे, मद्य किंवा नशायुक्त पदार्थांचे सेवन करणे, गैरवर्तणूक करणे इत्यादी बाबी आढळल्यास तसे सेवापुरवठादार यांना कळविण्यात येईल व संबंधित सेवा पुरवठादार यांचे मार्फत सादर सुरक्षारक्षकावर कार्यवाही होणे बंधनकारक राहील.

5.14) सुरक्षा रक्षकांच्या कामातील त्रुटी निदर्शनात आणून दिल्यावर त्यावर सेवा पुरवठादार यांना तात्काळ कार्यवाही करावी लागेल.

5.15) सुरक्षा रक्षकांनी विद्यार्थी, अभ्यागत, संस्थेचे अधिकारी व कर्मचारी यांचेशी सौजन्यपूर्ण व्यवहार करणे अपेक्षित आहे. सदर बाबतीत कोणाचीही तक्रार प्राप्त झाल्यास, त्याची योग्य शहानिशा केल्यानंतर संबंधित सुरक्षा रक्षक दोषी आढळून आल्यास त्यांचेवर कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

5.16) सुरक्षा रक्षकास आपत्कालीन परिस्थितीत प्रथमोपचार, आगीवर नियंत्रण मिळविणे, गर्दी नियंत्रित करणे इत्यादी सुरक्षा विषयक बाबींचे ज्ञान असणे अपेक्षित आहे.

5.17) सेवा पुरवठादार यांचे मार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा ह्या पूर्णतः करार पद्धतीच्या आहेत त्यामुळे शासकीय सेवेद्वारे मिळणारे कोणतेही हक्क व लाभ मिळण्यास सुरक्षा रक्षक पात्र राहणार नाहीत.

5.18) सुरक्षा रक्षकास मराठी , हिंदी या भाषांचे किमान बोलणे, लिहिणे व वाचण्याजोगे ज्ञान असणे अपेक्षित आहे. याबाबत आवश्यक ती खबरदारी सेवा पुरवठादार यांनी घेणे बंधनकारक राहील.

5.19) सुरक्षा रक्षक शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम व मजबूत बांध्याचे असणे क्रमप्राप्त आहे. तसेच त्यांचे वय ५८ वर्षापेक्षा अधिक नसावे याची काळजी घेण्याची संपूर्ण जबाबदारी सेवापुरवठादार यांची राहील.

5.20) सुरक्षा रक्षक कर्तव्यावर असताना त्यांचे जीवितास कोणत्याही कारणास्तव कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास त्याची जबाबदारी शासकीय तंत्रनिकेतन खामगाव यांचेवर राहणार नाही व याबाबत शासनातर्फे कोणत्याहीप्रकाराची नुकसान भरपाई अनुज्ञेय राहणार नाही या बाबतची स्पष्ट कल्पना सेवा पुरवठादार यांनी सुरक्षा रक्षकांस द्यावी.

**6) करार पद्धतीने सुरक्षा रक्षकांचे सेवा पुरवठादार यांनी पालन करावयाच्या प्रशासकीय ( Administrative ) अटी व शर्ती**

6.1) सेवा पुरवठादारास राज्य व केंद्र शासनाच्या कामगार कायद्यांचे पालन करणे बंधनकारक असेल. सदरहू कायद्याचे पालन करण्यास कुचराई होत असल्याचे निदर्शनास आल्यास सेवा पुरवठादाराने कंत्राट तात्काळ रद्द करण्यात येईल व कायदा उल्लंघनासंदर्भात कायदेशीर बाबींकरिता सेवा पुरवठादार जबाबदार राहील.

6.2) विहित मार्गाने निवड झालेल्या सेवा पुरवठादार यांनी सुरक्षा रक्षकास त्यांच्या संस्थेचे ओळखपत्र देणे बंधनकारक राहील. सदर सुरक्षा रक्षकाने युनिफॉर्म किंवा ड्रेसकोड मधेच संस्थेत कर्तव्यावर उपस्थित राहावे. सादर युनिफॉर्म किंवा ड्रेसकोड सेवा पुरवठादार यांनी सुरक्षा रक्षकास देणे बंधनकारक आहे.

6.3) सेवा पुरवठादारांनी सदर सेवा पुरविण्यासाठी नियुक्त मनुष्यबळाने कोणत्याही प्रकारचे धूम्रपान किंवा मद्यपान करणार नाहीत तसेच कोणत्याही वस्तूची चोरी / हानी व गैरवर्तन करणार नाहीत याबाबत त्यांचे हमीपत्र सादर करावे लागेल. या अनुषंगाने उद्भवणाऱ्या सर्व घटनास / परिणामास सेवा पुरवठादार संपूर्णतः जबाबदार राहील.

6.4) सेवा पुरवठादाराने पुरवलेल्या मनुष्यबळाच्या कायदेशीर रकमा ( वेतन, पीएफ, विमा इ. ) कामगारास नियमाप्रमाणे अदा करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. याबाबत कामगारांना देय रकमांची कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही व तत्सम कागदपत्रे वेळोवेळी सादर करावी लागतील.

6.5) सेवा पुरवठादाराने नियुक्त केलेल्या सुरक्षा रक्षकांनी कामाचे वेळी शासकीय मालमत्तेची काळजी घेणे आवश्यक असून शासकीय नुकसान झाल्यास त्याची भरपाई सेवा पुरवठादाराकडून करण्यात येईल.

6.6) सेवा पुरवठादाराने नियुक्त केलेल्या सुरक्षा रक्षकांनी आपली सेवा बजावताना कार्यालय परिसरात सुरक्षितेच्या नियमांचे पालन करावे. तथापि काम करताना काही अपघात इ. झाल्यास त्याची जबाबदारी शासकीय तंत्रनिकेतन खामगाव या कार्यालयाची राहणार नाही.

6.7) सेवा पुरवठादारास कार्य आदेश प्राप्त झाल्याच्या तारखेपासून सात दिवसाच्या आत आपले काम सुरु करावे लागेल.

6.8) सेवा पुरवठादारामार्फत नियुक्त सुरक्षा रक्षकांचे वय कामगार अधिनियमानुसार असावे तसेच नियुक्त सुरक्षा रक्षक शारीरिक दृष्ट्या सुदृढ असावा व तसे प्रमाणपत्र शासकीय तंत्रनिकेतन खामगाव या संस्थेला सादर करावे लागेल.

6.9) " सेवा ठेका " रकमेशिवाय कोणत्याही स्वरूपाची अन्य रक्कम देय असणार नाही तसेच आर्थिक बाबी निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी सेवापुरवठादाराची असेल. या कार्यालयाकडून सुरक्षा रक्षकास कोणतेही वैयक्तिक स्वरूपाचे वेतन व अन्य सवलती संदर्भात मागणी करता येणार नाही.

6.10) सेवा पुरवठादाराने नियुक्त केलेल्या सुरक्षा रक्षकांस या कार्यालयामार्फत नियमित करण्यासाठी व भविष्यात भरावयाच्या पदावर कोणताही दावा / हक्क सांगता येणार नाही.

6.11) सेवेदरम्यान नियुक्त सुरक्षा रक्षकाने आपली जबाबदारी चोखपणे बजावणे क्रमप्राप्त राहील. त्यांनी सेवेदरम्यानच्या कालावधीत सतत येरझाऱ्या घालणे अपेक्षित आहे. सेवेदरम्यानच्या कालावधीत सुरक्षा रक्षक खुर्चीत बसून आढळून आल्यास त्यांचे त्या दिवसाचे वेतन व तेवढ्याच रकमेचा दंड वसूल करण्यात येईल.

6.12) शासकीय मालमत्तेची काळजी घेणे हा सुरक्षा रक्षकाच्या जबाबदारीचा आवश्यक भाग असल्यामुळे सुरक्षा रक्षकाने संस्थेच्या सुरक्षा भिंतीची वेळोवेळी पाहणी करणे आवश्यक राहील. सुरक्षा रक्षकाच्या चुकीमुळे किंवा गैरवर्तणुकीमुळे शासकीय मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई सेवा पुरवठादार यांचेकडून करण्यात येईल.

6.13) कंत्राटाचे काम सुरु झाल्यानंतर सुरक्षा रक्षकांचा विमा काढणे सेवा पुरवठादारास बंधनकारक राहील याकरिता या संस्थेमार्फत कोणतेही अतिरिक्त शुल्क किंवा हप्ता देय राहणार नाही.

6.14) करार संपण्यापूर्वी काम बंद केल्यास सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्यात येईल.

6.15) सेवा पुरवठादाराने काम असमाधानकारक तसेच मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने आढळून आले नाही तर सेवा पुरवठादारावर नियमाप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

6.16) सदर कंत्राट कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे सर्व अधिकार शासकीय तंत्रनिकेतन खामगाव यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

6.17) सदर निविदा रद्द करणे किंवा निविदेमधील अटी व शर्ती यामध्ये बदल करण्याचे किंवा रद्द करण्याचे पूर्ण अधिकार प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन खामगाव यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

6.18) देयक पारित करणे हे शासनाकडून उपलब्ध अनुदानावर अवलंबून राहील.

6.19) प्रत्येक महिन्याचे देयक हे महिना-निहाय वेगवेगळे सादर करावे लागेल व कोषागारातून देयक पारित झाल्यावर देयकाची रक्कम अदा करण्यात येईल.

6.20) मासिक देयकांमध्ये सेवा कर, आयकर, विमा व इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करण्याची सर्वस्वी जबाबदारी सेवा पुरवठादाराची राहील. देयकांमध्ये कोणत्याही प्रकारच्या अतिरिक्त कराच्या वेगवेगळ्या रक्कमेचा समावेश करू नये.

6.21) सेवा पुरवठादारास, सुरक्षा रक्षकांच्या सेवा बंद करावयाच्या असल्यास त्यांनी एक महिन्याची पूर्व सूचना देणे किंवा एक महिन्याच्या देय वेतनाइतकी रक्कम प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन खामगाव यांचेकडे जमा करणे बंधनकारक राहील.

6.22) सुरक्षा रक्षकांच्या दरमहा वेतनाची जबाबदारी सेवा पुरवठादार यांची असेल.

6.23) शासनाद्वारे प्राप्त होणाऱ्या अनुदानास विलंब झाल्यास अश्या परिस्थितीत देय रक्कमेवर कोणत्याही प्रकारच्या व्याजाची मागणी करता येणार नाही.

6.24) शासनाच्या निर्देशानुसार पदसंख्येत कमी अधिक बदल करण्याचे सर्व अधिकार प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन खामगाव यांचेकडे राखून ठेवले आहे.

6.25) काळ्या यादीत न टाकल्याबाबत / बंदी न घातल्याबाबत निविदाकाराने घोषणापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

## निविदाकाराच्या पात्रतेचे निकष

1) निविदाकाराकडे महाराष्ट्र राज्य पोलीस अनुज्ञप्ती (PASARA) असणे बंधनकारक आहे.
2) निविदाकार महाराष्ट्र शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगार विभाग किंवा राज्य / केंद्र शासनाच्या सेवा पुरवठादाराच्या नोंदणीसाठी प्राधिकृत संस्थांकडे नोंदणीकृत असावा. सदर नोंदणी प्रमाणपत्र निविदा भरण्याच्या शेवटच्या दिनांकानंतर कमीतकमी एक महिन्यापर्यंत वैध असावे.
3) निविदाकारास यापूर्वी राज्य / केंद्र शासन अथवा त्यांची अंगीकृत मंडळे यांना सदरची सेवा पुरविण्याबाबतचा कमीतकमी एक वर्ष इतका अनुभव असणे आवश्यक आहे.
4) नोंदणीकृत आस्थापनेला अनुसरून आवश्यक वैयक्तिक मालकाचे वा संस्थेचे PAN / TAN कार्ड असावे.
5) निविदाकाराकडे "GST नोंदणी प्रमाणपत्र ब " असणे बंधनकारक आहे.
6) निविदाकाराकडे वैध "EPF नोंदणी प्रमाणपत्र" असणे आवश्यक आहे.
7) मागील वर्षाचे Income Tax Return फाईल केल्याचा पुरावा असणे आवश्यक आहे.
8) सदरच्या online निविदा प्रक्रियेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक निविदाकारास निविदा शुल्क रुपये 1000/- (अक्षरी रुपये एक हजार फक्त) एकूण रकमेचा ना परतावा निविदा शुल्काचा भरणा online पद्धतीने करता यावा याकरिता आवश्यक असणारा तपशील सोबत देण्यात आलेला आहे.
9) सदरच्या online निविदा प्रक्रियेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक निविदाकारास रु. 32380/- (अक्षरी रुपये बत्तीस हजार तीनशे ऐन्शी फक्त) इतक्या रकमेची "परतावा बयाणा रक्कम" online पद्धतीने सोबत देण्यात आलेल्या तपशिलानुसार भरावी.

## निविदा सादर करावयाची पद्धती

1) प्रत्येक निविदाकाराला एकच निविदा भरता येईल.
2) निविदा भरण्यापूर्वी निविदाकाराने स्वतः प्रत्यक्ष कार्यालयात भेट देऊन सर्व ईमारती व परिसराची प्रत्यक्ष पाहणी करूनच निविदा दाखल करावी.
3) शासकीय तंत्रनिकेतन खामगाव या संस्थेमार्फत निविदेच्या अंतिम दिनांकाच्या एक आठवड्यापूर्वी "Pre-Bid Meeting" online पद्धतीने आयोजित करण्यात येईल. त्या दरम्यान निविदाकाराने किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींनी उपस्थित राहून शंका निरसन करून घ्यावे. या मिटिंग ची लिंक संस्थेच्या संकेतस्थळावर ( website: www.gpk.edu.in ) मिटींगच्या नियोजित वेळेपूर्वी दोन तास अगोदर उपलब्ध करून देण्यात येईल.
4) दोन लिफाफा निविदा पद्धतीमध्ये : 1) तांत्रिक निविदा 2) वाणिज्यिक निविदा यांचा समावेश असेल.

4.1) तांत्रिक निविदा ओंलीने पद्धतीने अपलोड करतांना खालील कागदपत्रांचा समावेश करणे बंधनकारक असेल.

i. निविदाकाराच्या संस्थेच्या लेटरहेड वर सोबत दिलेले विवरणपत्र "अ" ( आवश्यक माहितीसह )
ii. निविदाकाराची संस्था, सदरची सेवा पुरविण्यासाठी अधिकृत असल्याचे राज्य / केंद्र शासनाच्या संबंधित विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र
iii. सेवा पुरवठादार यांच्या नोंदणीकृत संस्थेच्या संचालकांची किंवा स्वतःचे, नाव, कार्यालयीन पत्ता, ई-मेल पत्ता (असल्यास ) व संपर्क क्रमांक याबाबतची माहिती
iv. नोंदणीकृत आस्थापनेला अनुसरून आवश्यक वैयक्तिक मालकाचे वा संस्थेचे PAN / TAN कार्ड असावे.
v. नोंदंणी प्रमाणपत्र व कमीतकमी सहा महिने आधी नोंदणी केल्याचा पुरावा
vi. ई.पी.एफ. (Employee Provided Fund) रजिस्ट्रेशन क्रमांक व प्रमाणपत्राची प्रत
vii. मागील आर्थिक वर्षाचे (2021-2022) आयकर परतावा विवरणपत्र (Income Tax Return) भरल्याचा पुरावा
viii. राज्य / केंद्र शासन अथवा त्यांची अंगीकृत मंडळे यांना सेवा पुरविल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र
ix. निविदा शुल्क रु. 1000/- ऑनलाईन पद्धतीने भरल्याचा समर्पक पुरावा किंवा सदर शुल्क भरण्यापासून सूट असल्याबाबतचे नोंदणी प्रमाणपत्र
x. महाराष्ट्र राज्यात सेवा पुरविण्याचे अनुज्ञप्ती प्रमाणपत्राची प्रत
xi. बयाणा रक्कम रु. 32380/- (अक्षरी रुपये बत्तीस हजार तीनशे ऐन्शी फक्त) ऑनलाईन पद्धतीने भरल्याचा समर्पक पुरावा किंवा सदर शुल्क भरण्यापासून सूट असल्याबाबतचे नोंदणी प्रमाणपत्र
xii. काळ्या यादीत न टाकल्याबाबत / बंदी न घातल्याबाबत निविदाकाराचे घोषणापत्र त्यांच्या संस्थेच्या लेटरहेड वर अपलोड करावे.
xiii. तांत्रिक निविदा विवरण नमुना प्रपत्र - अ
xiv. तांत्रिक निविदा विवरण नमुना प्रपत्र - क

xv. लागू असल्यास, शासकीय नियमानुसार निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरण्यापासून सूट असल्याबाबतचा पुरावा

**टिप**

1) निविदा शुल्क व बयाणा रक्कम ऑनलाईन पद्धतीने भरण्याकरिता बँकेच्या खात्याचे विवरण खालील प्रमाणे आहे.

   i. खातेधारकाचे नाव : प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव
   ii. खाते क्रमांक : 11244270456
   iii. बँकेचे नाव : स्टेट बँक ऑफ इंडिया, खामगाव
   iv. शाखा : मुख्य शाखा, स्टेट बँक ऑफ इंडिया, खामगाव
   v. IFSC कोड : SBIN0000407
   vi. खाते प्रकार : Current Account

2) वरील नमूद करण्यात आलेल्या सोबत जोडावयाची कागदपत्रांची छायांकित प्रत सादर करावयाची असल्यास त्या स्व: साक्षांकित करणे गरजेचे आहे.

3) उ. ऊ. का. विभाग शा. नि. क्र. भां. ख. स. - 2014 / प्र क्र. 82 भाग III / उद्योग - 4, दिनांक 01/12/2016 च्या सुधारित नियमपुस्तिका पृ . क्र. 107 नुसार

   i. शासकीय मंडळ / महामंडळ / उपक्रमांना निविदेमध्ये निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरण्यापासून सूट देण्यात येईल.
   ii. निविदेबाबत स्वीकृती आदेश निर्गमित झाल्यानंतर निविदा चौकशी सोबत आलेल्या संपूर्ण बयाणा रक्कम शासकीय नियमानुसार संबंधितांना परत करण्यात येईल.
   iii. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

4.2) वाणिज्यिक निविदा / दरपत्रक

वरील प्रक्रियेअंतर्गत वाणिज्यिक निविदा सादर करताना निविदेतील आवश्यक माहिती GeM पोर्टलवर सादर करावी.

## निविदा उघडण्याच्या कार्यपद्धती

1) निविदा सूचनेमध्ये नमूद निविदा उघडण्याच्या नियोजित तारखेस व नियोजित वेळी, समितीसमक्ष निविदा उघडण्यात येईल. या प्रक्रियेदरम्यान निविदाकार किंवा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी पूर्व सूचना देऊन उपस्थिती नोंदवू शकतात.
2) सदर प्रक्रियेकरिता नियुक्त करण्यात आलेल्या तांत्रिक समितीद्वारे तांत्रिक छाननी ची प्रक्रिया पार पाडण्यात येईल.
3) पात्र निविदा धारकांची यादी शासकीय तंत्रनिकेतन खामगांव या संस्थेच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
4) तांत्रिक छाननी प्रक्रियेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांच्याच वाणिज्यिक निविदा उघडण्यात येतील.
5) वाणिज्यिक निविदेत संपूर्ण कामाचा करासहित एकत्रित दर नमूद नसल्यास निविदा फेटाळण्यात येईल याची नोंद घ्यावी.

6) दोन किंवा अधिक निविदाकारांच्या दरांमध्ये समानता आढळून आल्यास, या संस्थेमधील किंवा अन्य समकक्ष संस्थेतील काम करण्याचा एकत्रिक अनुभव अधिक असणाऱ्या सेवा पुरवठादारास प्राधान्य देण्यात येईल.

## कार्यादेश निर्गमित करण्याची कार्यपद्धती

1. सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतरच सदर कामाचे आदेश निर्गमित करण्यात येतील.
2. सेवा पुरवठादाराने रु. 100/- (अक्षरी रुपये शंभर फक्त ) च्या वर वरील प्रमाणे सर्व अटी व शर्ती विनाशर्त मान्य असल्याचा करारनामा नोटरी करून सोबत दिलेल्या प्रपत्र - क नुसार सादर करणे आवश्यक राहील.
3. वर नमूद अनुक्रमांक 1 व 2 ची पूर्तता झाल्यानंतर कार्यादेश निर्गमित करण्यात येईल व त्यानंतर सात दिवसांचे आत रु. 32380/- (अक्षरी रुपये बत्तीस हजार तीनशे ऐन्शी फक्त) सुरक्षा ठेव, बँक हमी (bank guarantee ) च्या स्वरूपात जमा करणे बंधनकारक राहील.
4. करार संपुष्टात येण्यापूर्वी सेवा बंद केल्यास संबंधितांची सुरक्षा ठेव जप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

## निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख आणि वेळ

उपरोक्त मोहोरबंद निविदा जाहिरातीत नमूद करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार स्वीकारण्यात व उघडण्यात येईल. याकरिता परत वेगळा पत्रव्यवहार करण्यात येणार नाही किंवा दूरध्वनी द्वारे कळविण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कार्य विवरण | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | निविदा प्रकाशित करण्याचा दिनांक | 27/01/2023 | |
| 2 | संकेतस्थळावर ई-निविदा उपलब्ध करण्याचा दिनांक | 27/01/2023 | |
| 3 | निविदा सादर करण्याचा सुरुवातीचा दिनांक | 27/01/2023 | |
| 4 | निविदा पूर्व ऑनलाईन बैठक दिनांक व वेळ (Pre-Bid Meet) - इच्छुक निविदा धारकांकरिता | 01/02/2023 वेळ सकाळी 11 वाजता | |
| 5 | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | 06/02/2023 | सायंकाळी 5.00 पर्यंत |
| 6 | तांत्रिक निविदा छाननी चा दिनांक | 07/02/2023 ते 13/02/2023 | |
| 7 | सर्व वाणिज्यिक निविदा उघडण्याचा दिनांक | 15/02/2023 | |

टिप : संबंधित निविदा अंतिम दिनांकाच्या सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत अपलोड करणे बंधनकारक राहील.

स्वा/-
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव

सहपत्र : विवरण नमुना प्रपत्र - अ आणि क

6) दोन किंवा अधिक निविदाकारांच्या दरांमध्ये समानता आढळून आल्यास, या संस्थेमधील किंवा अन्य समकक्ष संस्थेतील काम करण्याचा एकत्रिक अनुभव अधिक असणाऱ्या सेवा पुरवठादारास प्राधान्य देण्यात येईल.

## कार्यादेश निर्गमित करण्याची कार्यपद्धती

1. सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतरच सदर कामाचे आदेश निर्गमित करण्यात येतील.
2. सेवा पुरवठादाराने रु. 100/- (अक्षरी रुपये शंभर फक्त ) च्या वर वरील प्रमाणे सर्व अटी व शर्ती विनाशर्त मान्य असल्याचा करारनामा नोटरी करून सोबत दिलेल्या प्रपत्र - क नुसार सादर करणे आवश्यक राहील.
3. वर नमूद अनुक्रमांक 1 व 2 ची पूर्तता झाल्यानंतर कार्यादेश निर्गमित करण्यात येईल व त्यानंतर सात दिवसांचे आत रु. 32380/- (अक्षरी रुपये बत्तीस हजार तीनशे ऐन्शी फक्त) सुरक्षा ठेव, बँक हमी (bank guarantee ) च्या स्वरूपात जमा करणे बंधनकारक राहील.
4. करार संपुष्टात येण्यापूर्वी सेवा बंद केल्यास संबंधितांची सुरक्षा ठेव जप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

## निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख आणि वेळ

उपरोक्त मोहोरबंद निविदा जाहिरातीत नमूद करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार स्वीकारण्यात व उघडण्यात येईल. याकरिता परत वेगळा पत्रव्यवहार करण्यात येणार नाही किंवा दूरध्वनी द्वारे कळविण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कार्य विवरण | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | निविदा प्रकाशित करण्याचा दिनांक | 27/01/2023 | |
| 2 | संकेतस्थळावर ई-निविदा उपलब्ध करण्याचा दिनांक | 27/01/2023 | |
| 3 | निविदा सादर करण्याचा सुरुवातीचा दिनांक | 27/01/2023 | |
| 4 | निविदा पूर्व ऑनलाईन बैठक दिनांक व वेळ (Pre-Bid Meet) - इच्छुक निविदा धारकांकरिता | 01/02/2023<br>वेळ सकाळी 11 वाजता | |
| 5 | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | 06/02/2023 | सायंकाळी 5.00 पर्यंत |
| 6 | तांत्रिक निविदा छाननी चा दिनांक | 07/02/2023 ते<br>13/02/2023 | |
| 7 | सर्व वाणिज्यिक निविदा उघडण्याचा दिनांक | 15/02/2023 | |

टिप : संबंधित निविदा अंतिम दिनांकाच्या सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत अपलोड करणे बंधनकारक राहील.

स्वा/-
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव

सहपत्र : विवरण नमुना प्रपत्र - अ आणि क

धारकांनी / सेवा पुरवठादारांनी त्यांच्या नोंदणीकृत संस्थेच्या लेटरहेड वर खालील माहिती बिनचूक सादर करावी )

**प्रपत्र – अ**

### तांत्रिक निविदा विवरण नमुना प्रपत्र – अ

१)सेवा पुरवठादाराच्या संस्थेचे नांव.................................................................

२)संपूर्ण कार्यालयीन पत्ता .................................................................

३)संपर्काकरिता संपूर्ण पत्ता .................................................................

४)ई मेल पत्ता .................................................................

५)संपर्क क्रमांक .................................................................

६)संस्थेचा नोंदणी क्रमांक .................................................................

७) ज्याप्राधिकारांकडे नोंदणी केली आहे त्यांचा संपूर्ण पत्ता : .................................................................

.................................................................

८)निविदा धारक / संचालकाचे नांव .................................................................

९) संपर्काकरिता संपूर्ण पत्ता .................................................................

१०)ई मेल पत्ता .................................................................

११) संपर्क क्रमांक .................................................................

१२) अनुभवाचा तपशील .................................................................

( आवश्यक प्रमाणपत्रे जोडावीत )

१३) निविदा धारक / संचालकाच्या ओळखपत्राचा तपशील .................................................................

१४) यापूर्वी , निविदाकारास काळ्या यादीत टाकल्याबाबत / बंदी घातल्याबाबत कार्यवाही झालेली आहे काय? ..............

*(नसल्यास त्या बाबतचे घोषणापत्र निविदाकाराने सादर करणे बंधनकारक असेल)*

१४) खालील तपशील भरून आवश्यक प्रमाणपत्रांच्या स्व:साक्षांकित प्रती जोडाव्यात

| अ. क्र. | विवरण / प्रमाणपत्रे | तपशील नमूद करावा |
|---|---|---|
| ०१ | निविदाकाराची संस्था हि संबधित सेवा पुरविण्यासाठी अधिकृत असल्याचे राज्य/ केंद्र शासनाच्या प्राधिकृत विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र क्र. | |
| ०२ | निविदाकाराच्या संस्थेचा PAN /TAN कार्ड क्रमांक | |
| ०३ | सेवा कर (Service Tax) व GST नोदणी क्रमांक | |
| ०४ | ई.पी.एफ.( Empolyee Provided Fund) नोंदणी क्रमांक | |
| ०५ | मागील आर्थिक वर्ष (2022-2023) चे आयकर रिटर्न भरल्याचा पुरावा | |
| ०६ | राज्य / केंद्र शासन अथवा यांची अधिकृत / मंडळे यांना सेवा पुरविण्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र | |
| ०७ | निविदा शुल्क रु १००० /- भरल्याचा पुरावा (रोख पावती क्रमांक व दिनांक नमूद करावे व पुरावा जोडण्यात यावा ) | |
| ०८ | निविदा अनामत रक्कम रु 32380/- भरल्याचा पुरावा ( रोख पावती क्रमांक व दिनांक नमूद करावे व पुरावा जोडण्यात यावा ) | |
| ०९ | ईतर माहिती / कागदपत्रे | |

या व्यतिरिक्त आणखी काही माहिती द्यावयाची असल्यास ती संक्षिप्त स्वरुपात खाली नमूद करावी

.................................................................

मी, खालील सही करणार अये शपथपुर्वक प्रमाणित करतो कि, वर नमूद करण्यत आलेली माहिती खरी आहे . खोटी आढळल्यास होणाऱ्या परिणामाची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील तसेच सदर कंत्राटा च्या अनुषगाने निविदेत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत .

स्थळ :

दिनांक :

शिक्का

सेवा पुरवठादारची सही

पूर्ण नाव ...................................

**प्रपत्र – क**

## तांत्रिक निविदा विवरण नमुना प्रपत्र – क

*(रु. १००/- अक्षरी रुपये शंभर च्या stamp paper वर आवश्यक नोटरी प्रक्रियेसह तांत्रिक निविदे सोबत अपलोड करावे )*

मी, ........................................... ........................................... वय ................. रा.....................................

संस्थेचे नांव व पत्ता ................ ..... ....... .. ...........................................................................................

नोंदणी क्र. .................................................... , प्रतिज्ञेवर असे लिहून देतो / देते कि, शासनाच्या GEM पोर्टलवर प्रसिद्ध झालेली सुरक्षा रक्षक सेवा पुरवठा बाबतची निविदा क्र.................................. दिनांक ............................ मध्ये नमूद करण्यात आलेल्या कराराच्या सर्व अटी, शर्ती, नियम , निविदाकाराच्या पात्रतेचे निकष, निविदा सादर करावयाच्या पद्धती , निविदा उघडण्याच्या कार्यपद्धती , कार्यादेश निर्गमित करण्याची कार्य पद्धती , सर्व प्रपत्र , पोर्टल मध्ये नमूद सर्व बाबी तसेच इतर सर्व अनुषंगिक बाबी मी व्यक्तिश: वाचल्या व समजून घेतल्या आहेत. सदर सर्व बाबी मला मान्य असून बंधनकारक आहेत . मी, असेही लिहून देतो / देते कि, जर वरील बाबींमध्ये काही त्रुटी आढळल्यास होणाऱ्या कार्यवाहीस मी स्वत: जबाबदार असेल व या विरुद्ध कुठेही दाद मागण्याचा कोणताही हक्क मला नाही याचीही मला जाणीव आहे.

सदर निविदा क्र ......................................... मध्ये माझ्या संस्थेकडून सादर करण्यात आलेली सर्व माहिती खरी असून ती मला बंधनकारक आहे.

दिनांक :
स्थळ :

स्वाक्षरी ....................
नांव ....................................
भ्रमणध्वनी क्र.

१) साक्षीदाराची स्वाक्षरी ...................................
नांव ............................................................
पत्ता ............................................................

(२) साक्षीदाराची स्वाक्षरी ................................
नांव ............................................................
पत्ता ............................................................

*********